# प्रेस नोट

दि.१७/०९/२०१८

**लोकसेवक जयसिंग दत्तात्रय धनवटे, मोजणीदार शाखा अभियंता पाटबंधारे विभाग, शाखा चितळी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना २०००/– रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, यातील आरोपी लोकसेवक जयसिंग दत्तात्रय धनवटे, वय–५७ वर्ष, मोजणीदार शाखा अभियंता पाटबंधारे विभाग कार्यालय, शाखा चितळी, ता.राहाता, जि.अहमदनगर (वर्ग–३) यांनी तक्रारदार यांचे रामपूर, ता.राहाता शिवारातील शेतीमध्ये चारीतून पाणी सोडल्याचे मोबदल्यात आज दि.१७/९/२०१८ रोजी तक्रारदार यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष २०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम सिध्देश्वर मंदिरासमोर, गोंडेगांव, ता.श्रीरामपूर येथे पंच साक्षीदारासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे पोलीस उप अधीक्षक श्री.किशोर चौधरी, पोलीस उप अधीक्षक यांचेशी संपर्क साधावा. त्यासाठी १०६४ हा निशुल्क टोल फ्रि नंबर सुरु करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | पोलीस उप अधीक्षक कार्यालय,जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर |
| **फोन नंबर** | ०२४१–२४२३६७७ |
| **टोल फ्रि नंबर** | १०६४ |

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक वभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner